08-06-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 6/7/2025 10:14 PM Page 1

कडशी मोपा येथील पावसाळ्यात दहा घरांना धोका

कडशी मोपा कमी उंची : जोरदार पावसाळ्यात संपर्क तुटतो | त्वरित उपाययोजनेची गरज : राजन कोरगावकर

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. ७ : पेडणे तालुक्यातील मोपा कडशी नदीच्या पलीकडे एकूण दहा घरे आहेत. आणि या नदीवर दोन ठिकाणी कमी उंचीचे पूल उभारल्यामुळे जोरदार पाऊस पडला, तर या पुलावरून मोठ्या प्रमाणात पाणी वाहून जाते. त्यामुळे अलीकडून पलीकडे पलीकडून अलीकडे कुणालाही येता जाता येत नाही. त्यामुळे पूर्णपणे संपर्क तुटलेला असतो. जनजीवन विस्कळीत होत. हे दरवर्षी पावसाळ्यात होते. गेल्या वर्षी स्थानिक आमदार प्रवीण आर्लेकर जलसिंचन खात्याचे अधिकारी स्थानिक सरपंच उपसरपंच पंच सदस्य नागरिकांनी या ठिकाणी भेट देऊन नागरिकांच्या थोड्या प्रमाणात समस्या ऐकल्या होत्या. आणि पुढचा पाऊस येण्यापूर्वी या पुलाला उंची देण्याची ग्वाही दिली होती. परंतु या घटनेला वर्ष होत असून आजही या पुलांना उंची न दिल्यामुळे लोकांचा संपर्क पुन्हा जोरदार पाऊस लागल्यानंतर तुटणार आहे.

कडशी मोपा नदी पलीकडे एकूण दहा घरे आहेत त्यापैकी नऊ घरे एका बाजूला आहे. आणि त्या ठिकाणी एक कमी उंचीचा मिनी पूल तर दुसऱ्या ठिकाणी जे घर शंकर गाड हे थोर स्वातंत्र्यसैनिक त्यांच्या कुटुंबीयांचे आहे. त्यांच्या घराकडे जाण्यासाठीह मिनी छोटे खाने कमी उंचीचा पूल उभारला होता. त्या पुलावरूनही पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाण्याचा पूर आल्यामुळे त्यांनाही घरातून बाहेर पडण्यासाठी अलीकडून पलीकडे जाण्यास मिळत नाही. त्यामुळे विद्यार्थी असेल त्यांच्या शाळा हायस्कूल कॉलेज चुकत असतात. शिवाय नोकरीला जाणारे मग सरकारी नोकरी असो, किंवा खाजगी कंपनीत जाणाऱ्या नोकरदारांना सुद्धा, त्या काळात घरात बसल्याशिवाय पर्याय नसतो. अशी स्थिती त्या भागात दरवर्षी दिसून येते.

सरकारने एकूण दहा ही कुटुंबीयांसोबत संयुक्तपणे चर्चा बैठक घेऊन मध्यावती ठिकाणी एकूण दहा ही घराना चांगल्या प्रकारे पावसाळ्यात सोय होईल, त्या दृष्टीतून पूल उभारण्याची गरज आहे. तशा प्रकारचे सरकारने प्रयत्न करावेत अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

मिशन फॉर लोकलचे राजन कोरगावकर यांनी सांगितले की, पावसाळा सुरू झाल्यानंतर आवर्जून आठवण येते ती कळशी मोपा भागातील दहाही कुटुंबांची. त्या काळात पावसाळा जोरदार सुरू असताना जनसंपर्क तुटलेला असतो. पावसाळ्यात दरवर्षी आठ दहा दिवस संपर्क तुटलेला असतो. हे आम्ही दरवर्षी पाहत असतो. आमदार मंत्र्यांनी यापूर्वी अनेक वेळा कडशी वासियाना आश्वासनापलीकडे काहीच दिलेले नाही. पावसाळ्यापूर्वी तुमची सोय केली जाईल, अशी ग्वाही दिली जाते. अधिकाऱ्यांनी सुद्धा पावसाळ्यापूर्वी उपाययोजना केली जाईल, असे सांगितले होते. परंतु हे स्वप्न आज पर्यंत पूर्ण झाले नाही. एखाद्या उंचीचा पदफुल तातडीने मुख्यमंत्री निधीतून आपत्कालीन सेवेद्वारे या ठिकाणी ज्या ठिकाणी दहा घरे आहेत, त्या दहाही घराना दिलासा मिळवून देण्यासाठी सरकार प्रयत्न करू शकतो. त्या नजरेतून सरकारने प्रयत्न करायला हवेत. पावसाळ्यात १५, १५ दिवस गावातील जनतेचा संपर्क तुटलेला असतो. त्यामुळे सरकारने आणि आपत्कालीन सेवेच्या अधिकाऱ्यांनी पुढाकार घेऊन या कळश मोपा नदीवर एखादा उंचीचा लोखंडी पुल उभारून एकूण दहा ही घराना येण्या जाण्यासाठी सोय करावी, अशी मागणी यावेळी

कोरगावकर यांनी केली. दरम्यान पावसाळ्यात या पुलावरून मोठ्या प्रमाणात पाणी आल्यानंतर कुणीही अलीकडून पलीकडे पलीकडून अलीकडे जाण्यासाठी मार्गच नाही. त्यामुळे यदाकदाचीत एखादा घरातील सदस्य जर आजारी पडला तर त्याला वैद्यकीय सेवेसाठी सुद्धा नेता येत नाही. याची दखल सरकारने घेऊन तातडीने उपाययोजना करावी अशी मागणी होत आहे.

पान १ वरून

महाराष्ट्रातील मतदानात 'फिक्सिंग' झाल्याचा राहुल गांधींचा आरोप

उत्तर दिले असून, त्यांच्या आरोपांना हास्यास्पद आणि कायद्याचा अपमान करणारे असे संबोधले आहे. आयोगाने आपल्या अधिकृत वेबसाईटवर दिलेल्या उत्तरात म्हटले आहे की, महाराष्ट्रातील मतदार यादीसंदर्भात वारंवार केले जाणारे निराधार आरोप कायद्याच्या राज्याला आणि निवडणूक प्रक्रियेला बदनाम करण्याचे प्रयत्न आहेत.

आयोगाने असेही नमूद केले की, चुकीची माहिती पसरवणारे आरोप केवळ कायद्याचा अनादर नाहीत, तर निवडणूक प्रक्रियेमध्ये सहभागी होणाऱ्या हजारो अधिकृत प्रतिनिधींची आणि लाखो निवडणूक कर्मचाऱ्यांची बदनामी करणारे आहेत. निवडणुकीतील पराभवानंतरच असा आरोप करणे म्हणजे लोकशाही प्रक्रियेकडे दुर्लक्ष करण्यासारखे आहे.

दुसरीकडे गांधी यांच्या लेखाबाबत बोलताना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांना खोटारडे म्हटले आहे. महाराष्ट्राच्या निवडणुकीतील मतदानाच्या आकडेवारीबाबत यापूर्वीच निवडणूक आयोगाने सप्रमाण स्पष्टीकरण दिलेले आहे, असे फडणवीस यांनी सांगितले.

केरी सत्तरीत आज सत्व परीक्षा नाट्यप्रयोग

■ टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. ७ : श्री आजोबा महिला दशावतारी नाट्य मंडळ केरी सत्तरीतर्फे रविवार दि.८ रोजी संध्याकाळी ७ वाजता श्री बेळवंश कुळकार देवस्थान हळीतवाडा केरी सत्तरी येथे 'सत्व परीक्षा' हा नाट्यप्रयोग होणार आहे. कै. गणू नारायण गावस यांच्या स्मरणार्थ आयोजित ४ थ्या दशावतारी नाट्य महोत्सवात हा प्रयोग होईल.

या नाटकात गीताली गोपाळ गावस, हर्षदा हरीचंद्र गावस, जानकी रघुनाथ परब, सरिता चंद्रकांत गावस, उत्कर्षा उत्तम गावस, सिंधीया संतोष पार्सेकर,सौ.सुमित्रा सुनिल शेटकर, लता लाडू गावस, लक्ष्मी शिवाजी गावस, अमिता लक्ष्मण बांदेकर, वैष्णवी गावकर, जान्हवी रघुनाथ परब, अर्पिता अरुण गावस यांच्या भूमिका असून या नाटकाचे लेखन वामन ठाकूर यांनी केले आहे. संवादिनी साथ विशाल मणेरीकर,तबला साथ गोकुळदास गावस, झान्ज नारायण माजिक यांची असून या नाटकाचे संयोजक चंद्रकांत गावस, प्रभाकर माजिक, संतोष पार्सेकर आहेत.

CHANGE IN NAME

I **Suryabegam Babulal Bargir**, R/O H. No 434/8/8, Ghanemarad, Xeldem, Quepem South - Goa. do hereby change my name from **SURYBEGAUM** TO **SURYABEGAM BABULAL BARGIR.** Hereinafter, in all my dealings and Official documents I will be known by the name **SURYABEGAM BABULAL BARGIR.**

Government of Goa
OFFICE OF THE CIVIL REGISTRAR-CUM-SUB REGISTRAR, SALCETE Room No. 209, 2nd floor, Mathany Saldhana Administrative Complex, Margao - Goa Office Tel.No. 9405864458 / Office Email: crsrsalcete-rd.goa@nic.in
No: CR/SR/SAL/ 1815 /2025 Dated: 02/ 06/ 2025

NOTICE

Office of the Civil Registrar-cum- Sub Registrar and Special Notary, Salcete.

Shri. Kiran Harish Mesta, Jt. Civil Registrar -cum-Sub Registrar I & II and Special Notary in the said Judicial Division of Salcete, Margao.

In accordance with Section 346(11) of the Goa Succession Special Notaries and Inventory Proceedings Act 2012 it is hereby made public that by Deed of Declaration of Heirship dated 27/05/2025 duly recorded under Book No. 1730 at page 77V to 80 of the office, the following is recorded: That LOURENCO FERNANDES, who originally hailed from Navelim died on 1 1 /07 / 2023 at Sirvodem, Margao, Goa, intestate and without making any will, gift or without executing any other disposition of his last wish, but leaving behind his wife MRS. ROSADA COLACO, widow as his moiety sharer and his following children/heirs namely 1) Mr. Michael Quilton Fernandes, married to Mrs. Nadia Pereira, 2) Mr. Muriel Jesus Fernandes, bachelor, as his " sole and universal heirs". there being no one else or no other person or heir who in terms of Law of Succession in force in this state of Goa may prefer the estate left by the deceased persons. Any person having objection to this deed may file in this office within one month from the date of its publication.

Sd/-
Shri Kiran Harish Mesta
Special Notary and Jt.Civil Registrar-cum-Sub Registrar I&II, Salcete Margao Goa

PUBLIC NOTICE

Notice: is hereby given to the Public at large that we are investigating and verifying the title of the Owners namely Miss Rosemary Antao, Mrs. Antonette D'Souza, Mr. Oswald Joseph D'Souza, Mrs. Pasqueline Karkera, Mr. Bhaskar Karkera, Mr. Raiman Antao, Mrs.Catherine Merchant and Mr.Mustafa Merchant, on behalf of my Client, with respect to the property, more particularly described in the "SCHEDULE", hereunder written, (Hereinafter for the sake of brevity referred to as the "Said property", free from all encumbrances and claims of any nature whatsoever and subject to clarity of Title ;

All entities/persons including any bank or financial institution having any right, title, benefit, interest, claim, or demand in respect of the said property or any part/s thereof, by way of sale, exchange, lease, Sub-lease, assignment, mortgage, charge, lien, inheritance, bequest, succession, gift, Maintenance, easement, trust, tenancy, Sub-tenancy, license, occupation, possession, family arrangement/ settlement, decree or order of any court of Law, contract/agreement, development rights, partnership, any writing, and/or arrangement or otherwise howsoever are hereby required to make the same known in writing, along with supporting documentary/evidence, to the undersigned at the address and email Id mentioned below, within 10 (Ten) days from the date hereof, failing which such right, title, benefit, interest, claim and/or demand, if any, shall be deemed to have been waived and/or abandoned and my client shall be free to proceed with the sale transaction in respect of the Said Property.

SCHEDULE REFERRED TO HEREINABOVE

ALL THAT property known as "ABAL BHAT MOROD" or "TUMB" or CHITA CUNGUI or "CABECEIRA" or "CHITA-CUNGUI" or "HALF OF PROPERTY CHILCOUGUY", admeasuring an area of 50,750 (Fifty Thousand Seven Hundred Fifty) Sq. Mtrs., situated at Guirdolim Salcete, within the jurisdiction of village Panchayat of Guirdolim, Taluka and Sub-District of Salcete, District of South Goa , State of Goa, described in the Land Registration Office of Salcete under No. 2980 and enrolled in the Taluka Revenue Office No. 367 of Guirdolim village of Salcete Taluka and surveyed under Survey No. 95, Sub Division No. 0 of village Guirdolim and is bounded as under:-

On the East: By property surveyed under no. 86 of Guirdolim Village; **On the West:** By property surveyed under no. 109 and No. 110 of Guirdolim Village; **On the North:** By property surveyed under no. 85, No. 97, No. 99, No. 100, No.101, and No. 107 of Guirdolim Village; and **On the South:** By property surveyed under No. 111 of Guirdolim village.

Margao-Goa; Date: 07/06/2025 SEAL

Sd/- **Adv Kapil K. Vernekar & Associates**
Office No.26, 1st Floor, Midas Touch Bldg Opp. Margao Sessions Court, Margao, Goa.

बलराम उच्च माध्यमिक विद्यालयात 'एकपेड माँ के नाम'

अर्धफोंड : बलराम उच्च माध्यमिक विद्यालयाच्या आवारात 'एकपेड माँ के नाम' अंतर्गत फुलझाडे लावताना विद्यार्थिनी.

■ टीम दैनिक हेराल्ड

आगोंद, दि. ७ : अर्धफोंड-पैंगीण काणकोण येथील बलराम उच्च माध्यमिक विद्यालयात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त झाडे लावण्यात आली. विद्यालयाच्या एन एस एस प्रोग्रॅम आफिसर शिक्षिका सौ. सोनिया नाईक देसाई हिने झाडे लावण्याचे चे काम विद्यार्थ्यांकडून करून घेतले व विद्यार्थ्यांना त्याचे महत्व ही पटवून दिले, विद्यार्थ्यांनी उत्साहाने हे कार्य पुर्ण केले. या कार्यात विद्यालयाच्या प्रभारी शिक्षिका सौ कविता गावकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच शिक्षिका आरती पैंगीणकर, शिक्षक नीलेश गावकर व विशांत गावकर यांनी सहकार्य केले.

शांतादुर्गा प्राथमिक शाळेत रंगपेटी, शालेय साहित्याचे वाटप

■ टीम दैनिक हेराल्ड

डिचोली : शांतादुर्गा प्राथमिक शाळेत रंगपेटी व शालेय साहित्याचे वाटपप्रसंगी तारा सरदेसाई, रमा सरदेसाई –नायक,अभिजित तेली, डॉ. कौस्तुभ पाटणेकर, ॲड. केदार शिरगावकर, ॲड. स्मिता म्हार्दोळकर, सुविद्या गणपुले व इतर.

डिचोली, दि. ७ : आज नविन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी स्व. शशीकांत जयवंतराव सरदेसाई कृतज्ञता निधी विश्वस्त च्या अध्यक्ष सौ तारा सरदेसाई, विद्या वर्धक मंडाळाचे अध्यक्ष श्री विजय सरदेसाई , संचालिका सौ.रमा सरदेसाई – नायक यांनी इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत केले.शाळेच्या पहिल्या दिवशी स्व. शशिकांत जयवंतराव सरदेसाई कृतज्ञता निधी विश्वस्त च्या वतीने पहिली ते चौथीच्या सर्व विद्यार्थ्यांना रंगपेटी व इतर शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. या सोहळ्यात विद्या वर्धक मंडाळाचे अध्यक्ष विजय सरदेसाई, शशीकांत जयवंतराव सरदेसाई कृतज्ञता निधी विश्वस्तच्या अध्यक्ष तारा सरदेसाई, संचालिका रमा सरदेसाई –नायक, अभिजित तेली, डॉ. कौस्तुभ पाटणेकर, ॲड. केदार शिरगावकर, ॲड. स्मिता म्हार्दोळकर, सुविधा गणपुले आदी मान्यवर उपस्थित होते. शशीकांत जयवंतराव सरदेसाई कृतज्ञता निधी विश्वस्तच्या अध्यक्ष तारा सरदेसाई, विजय सरदेसाई, रमा सरदेसाई – नायक व इतर मान्यवरांच्या हस्ते प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना रंगपेटी तसेच इतर शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले.

विद्या वर्धक मंडाळाचे अध्यक्ष विजय सरदेसाई यांनी यावर्षी इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत केले व सर्व विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

दरवर्षी शशिकांत जयवंतराव सरदेसाई कृतज्ञता निधी विश्वस्ततर्फे शांतादुर्गा प्राथमिक तसेच माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय उपयुक्त साहित्याचे वितरण करण्यात येते. सदैव विद्यार्थ्यांच्या हितासाठी उपक्रम राबवणाऱ्या या शशीकांत जयवंतराव सरदेसाई कृतज्ञता निधी विश्वस्तांच्या स्तुत्य उपक्रमाचे शाळेच्या वतीने अभिनंदन आणि आभार मानण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुविद्या गणपुले यांनी केले.

मांद्रे भूमी हरित करण्यासाठी योगदान द्यावे

मांद्रे : वृक्षारोपण करताना माजी आमदार दयानंद सोपटे. बाजूला भाजप अध्यक्ष उत्तम पोखरे, नयनी शेट गावकर, प्राजक्ता कानाईक, ब्रजेश केरकर व इतर.

■ टीम दैनिक हेराल्ड

- माजी आमदार दयानंद सोपट
- मांद्रेत भाजपतर्फे वृक्षारोपण उत्साहात

हरमल, दि. ७ : मांद्रे भाजप मंडलतर्फे पर्यावरण दीनानिम्मित वृक्षारोपण कार्यक्रम नुकताच झाला. सदर कार्यक्रम श्री भगवती मंदिराच्या प्रांगणात माजी आमदार तथा भाजपचे प्रवक्ते दयानंद सोपटे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.पर्यावरण दिवस साजरा करताना निसर्गाच्या रक्षणासाठी प्रत्येक व्यक्तीने एक झाड लावण्याची गरज आहे.निसर्ग सानिध्यातून आपणास प्राणवायू अपेक्षित असतो तसेच एकूण पर्यावरण संतुलित होत असते.झाड लावल्यानंतर ते झाड जगवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे.

मांद्रे मतदारसंघात भाजपतर्फे वृक्षारोपण कार्यक्रम घडवून आणण्यात अनेकांनी प्रयत्न केले,त्याबद्दल अभिनंदन आहे. भूमी हरित करण्यास सर्वांनी योगदान द्यावे, असे माजी आमदार दयानंद सोपटे यांनी व्यक्त केले. यावेळी मांद्रे भाजप मंडळ अध्यक्ष उत्तम पोखरे, सरचिटणीस प्रदीप नाईक, माजी सरपंच वैशाली शेटगावकर, प्राजक्ता कानाईक,जिल्हा कार्यकारिणी सदस्य नयनी शेटगावकर, अमित शेटगावकर, ब्रजेश केरकर, मिलिंद तळकर, संतोष तांडेल, सुरेश खवणेकर, राजू गावडे, शिल्पा म्हामल व अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.शेवटी सरचिटणीस प्रदीप नाईक यांनी आभार मानले.

विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे योगदान कायम लक्षात ठेवावे

- गिरिश बैलुडकर
- साखळी सरकारी महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

पर्वरी : उत्तर गोव्याचे वन परिक्षेत्र अधिकारी गिरीश बैलुडकर यांचा रोपटे देऊन सन्मान करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस.

पर्वरी, दि. ७ : साखळी सरकारी महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी ही माझी ओळख माझ्यासाठी अभिमानास्पद असून माझ्या जडणघडणीत या महाविद्यालयाचा मोठा वाटा आहे. विद्यार्थ्यांनी सतत शिकत राहावे, तसेच वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात नैतिक आचरण ठेवावे. आपले व्यक्तिमत्त्व घडविण्यात शिक्षकांनी दिलेले योगदान विद्यार्थ्यांनी कायम लक्ष्यात ठेवावे व यश मिळविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन उत्तर गोव्याचे वन परिक्षेत्र अधिकारी गिरीश बैलुडकर यांनी केले. कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय साखळी येथे आयोजित केलेल्या पारितोषिक वितरण सोहळा आणि पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभ सोहळ्यातील प्रमुख पाहुणे या नात्याने वन परिक्षेत्र अधिकारी गिरीश बैलुडकर बोलत होते. यावेळी मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस, पदव्युत्तर विभागाचे उपप्राचार्य शरत जमखंडी, शैक्षणिक विभागाच्या उपप्राचार्या प्रीती पेडणेकर, प्रशासकीय विभागाच्या उपप्राचार्या रोझालिना डिसिल्वा, विद्यार्थी कल्याण समितीचे संयोजक डॉ. सागर पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. प्राचार्य डॉ. नामदेव गावस यांनी मान्यवरांचे स्वागत करून वार्षिक अहवालाचे वाचन केले. प्रमुख पाहुणे गिरीश बैलुडकर यांची ओळख उपप्राचार्य शरत जमखंडी यांनी करून दिली. कृतिका नावेलकर यांनी सूत्रसंचालन केले. तर आभार डॉ. सागर पाटील यांनी मानले. अंकुश सिनारी, गॉर्डन पायरस, रोहिणी कमलाकर, अभिषेक मिश्रा या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामुळे झालेला लाभ आणि शिक्षकांबद्दलची कृतज्ञता आपल्या मनोगतातून व्यक्त केली.

महाविद्यालयाची यशस्वी घोडदौड : प्राचार्य गावस

साखळी सरकारी महाविद्यालयाने कला, क्रीडा, एनएसएस, एनसीसी आणि शैक्षणिक पातळीवरही स्वत:चा नावलौकिक उमटवला असून महाविद्यालयाची यशस्वी घोडदौड येणाऱ्या काळातही कायम अशीच चालू राहील असे उद्गार महाविद्यालयाच्या वार्षिक कामगिरीचा आढावा घेताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस यांनी काढले.

सर्वोत्कृष्ट सर्वगुण संपन्न विद्यार्थी पुरस्कार – रिफा शेख, साईश गावडे, नुरेन शाह, माधवराज परब, गॉर्डन पायरस, प्रियांका कोटेकर, भावार्थ धोंड, आस्मा मुजावर, वैष्णवी गावस. सर्वोत्कृष्ट ग्रंथालय वापरकर्ता पुरस्कार धनश्री जाधव. सर्वोत्कृष्ट मंडळ सदस्य पुरस्कार–सुजल शिरोडकर आणि यश शेट्ये. सर्वोत्कृष्ट एनएसएस स्वयंसेवक पुरस्कार–शिवम चोडणकर, सर्वोत्कृष्ट एनसीसी कॅडेट पुरस्कार–एसयुवो आस्मा मुजावर, सर्वोत्कृष्ट आउटगोइंग विद्यार्थी पुरस्कार–आस्मा मुजावर, सर्वोत्कृष्ट खेळाडू आणि क्रीडा महिला पुरस्कार आर्यन साळुंखे आणि सेजल नाईक यांना प्राप्त झाला.

फातोर्डा मतदारसंघात विश्व पर्यावरण दिन साजरा

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव : पर्यावरण दिनानिमित्त झाड लावताना भाजप प्रदेशाध्यक्ष दामू नाईक, उपनगराध्यक्ष बबिता नाईक, फातोर्डा भाजप मंडळ अध्यक्ष श्वेता लोटलीकर, मनोहर बोरकर, नगरसेवक व भाजप कार्यकर्ते.

मडगाव, दि. ५ : विश्व पर्यावरण दिनानिमित्त तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या सेवाकार्याची ११ वर्षे पूर्ण करीत असल्याचे औचित्य साधून एक पेड माँ के नाम अंतर्गत फातोर्डा भाजपा मंडळाच्या वतीने साजरा करण्यात आला.याप्रसंगी प्रदेशाध्यक्ष दामू नाईक यांच्या हस्ते तसेच मंडळ अध्यक्षा श्वेता लोटलीकर आणि मडगाव नगरपालिकेच्या उपाध्यक्ष बबिता नाईक, नगरसेवक सदानंद नाईक, कामिलो बारेटो व इतरांच्या हस्ते घोगळ येथील श्री संकट भंजन हनुमान मंदिराच्या परिसरात फळफळांची झाडे लावून साजरा करण्यात आला.याप्रसंगी प्रदेशाध्यक्ष दामू नाईक यांनी आपल्या भाषणात झाडे पर्यावरण समतोल व रक्षणासाठी एक मोठी जबाबदारी पार पाडत असतात. आज लावलेल्या झाडांची योग्य काळजी घेण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्यांनी आपले योगदान देण्याचा विचार व्यक्त केला.

दामू नाईक यांनी पुढे बोलताना सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या सेवाकार्याची ८ जून रोजी ११ वर्षे पूर्ण करीत असल्याने आज संपूर्ण देशभर आपल्या आईच्या नावे झाड लावून पर्यावरण जतन करण्यासाठी प्रयत्न होत आहे. सुरवातीला मंडळ अध्यक्षा श्वेता लोटलीकर यांनी प्रदेशाध्यक्ष व उपस्थितांचे स्वागत केले व पर्यावरण संबंधी आपले विचार मांडले. तर सरचिटणीस गुणाजी देसाई यांनी आभार मानले. या कार्यक्रमास फातोर्डा भाजपा मंडळाचे माजी अध्यक्ष तथा मडगाव रवींद्र भवनचे उपाध्यक्ष मनोहर बोरकर, गोवा कोकणी अकादमीचे अध्यक्ष डॉ. पूर्णानंद च्यारी, महिला मोर्चा अध्यक्षा आशा गावस व इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाहिजेत

Wanted Counter sales boys and sales girls, staying in and around Panjim, Pls. Contact Tel. No. 9011937381

व्यवसाय

Shop for rent at Panjim, Jairam Complex, Mala, Panjim. Pls. Contact Tel. No. 9011937381